# अथ्रव्यवस्थेची ओठ्ठख

**प्र.२ ख़लील प्रशनंची एक ते दोन वाक्यत उत्तर लिहा**

## १.१ प्रस्तावना

**१. उत्पादक उपक्रमांची नावे सांगा.**

**उत्तर:** उत्पादक उपक्रमांची नावे खालीलप्रमाणे आहेत:

i. शेती
ii. उद्योग
iii. खाणकाम
iv. वाहतूक
v. दळणवळण

## १.२ अर्थव्यवस्थेचा अर्थ

**२. लोक वस्तू आणि सेवा बाजारातून विकत का घेतात?**

**उत्तर:** i. आपल्या गरजा भागविण्यासाठी लोक वस्तू आणि सेवा बाजारातून विकत घेतात.

ii. वस्तू आणि सेवा दोन प्रकारच्या असतात – जीवनावश्यक वस्तू आणि सेवा (जसे अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण) व चैनीच्या वस्तू आणि सेवा (जसे हॉटेलिंग, मनोरंजन इ.)

**३. पूर्वी ग्रामीण भागातील लोकांचे कोणते दोन मुख्य उपक्रम होते?**

**उत्तर:** शेती आणि हस्तव्यवसाय हे ग्रामीण भागातील लोकांचे दोन मुख्य उपक्रम होते जे त्यांना काम करण्याचे साधन आणि उदरनिर्वाहासाठी उत्पन्न पुरवत.

**४. आज अस्तित्वात असलेल्या कोणत्या अर्थव्यवस्था ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विस्तार दर्शवितात?**

**उत्तर:** आज अस्तित्वात असलेल्या राज्यस्तरीय (महाराष्ट्र), राष्ट्रीय (भारत) आणि जागतिक (विश्व) अर्थव्यवस्था ह्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विस्तार दर्शवितात.

***५. अर्थव्यवस्था म्हणजे काय?**

**उत्तर:** i. विशिष्ट भूप्रदेशातील उत्पादन, वितरण आणि वस्तू व सेवांचा उपभोग यांच्याशी संबंधित असलेले उपक्रम म्हणजे अर्थव्यवस्था होय.

ii. विशिष्ट देशातील किंवा प्रदेशातील उत्पादन, व्यापार आणि पैशाचा पुरवठा यांमधील संबंध अशीही अर्थव्यवस्थेची व्याख्या केली जाते.

**६. 'ऑक्सफर्ड ॲडव्हान्स्ड लर्नर्स' शब्दकोशातील अर्थव्यवस्थेची व्याख्या सांगा.**

**उत्तर:** i. विशिष्ट देशातील किंवा प्रदेशातील उत्पादन, व्यापार आणि पैशाचा पुरवठा यांमधील संबंध

अशी अर्थव्यवस्थेची व्याख्या ‘ऑक्सफर्ड ॲडव्हान्स्ड लर्नर्स’ या शब्दकोशाप्रमाणे केली जाते.

ii. म्हणजेच, अर्थव्यवस्था ही विशिष्ट क्षेत्रातील उत्पादन, वितरण, उपभोग आणि उपलब्ध साधनसामग्रीचे विभाजन यांच्याशी संबंधित असते.

**७. अर्थव्यवस्था ही विशिष्ट प्रदेशातील कोणत्या क्षेत्रांशी संबंधित आहे?**

**उत्तर:** अर्थव्यवस्था ही विशिष्ट प्रदेशातील पुढील क्षेत्रांशी संबंधित आहे:

i. उत्पादन

ii. वितरण

iii. उपभोग

iv. उपलब्ध साधनसामग्रीचे विभाजन

## १.३ अर्थव्यवस्थेचे प्रकार

**८. अर्थव्यवस्थेचे तीन प्रकार सांगा.**

**उत्तर:** अर्थव्यवस्थेचे तीन प्रकार:

i. भांडवलशाही अर्थव्यवस्था, उदा. अमेरिकन संघराज्ये

ii. समाजवादी अर्थव्यवस्था, उदा. चीन

iii. मिश्र अर्थव्यवस्था, उदा. भारत

***९. 'मिश्र अर्थव्यवस्था' ही संकल्पना स्पष्ट करा.**

**उत्तर:** मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक आणि खासगी या दोन्ही क्षेत्रांचे सह-अस्तित्व असते. याबाबतीत उत्पादनाच्या साधनांचे स्वामित्व आणि व्यवस्थापन सरकारकडे तसेच खाजगी क्षेत्राकडेदेखील असते. उदा. भारत.

## १.४ अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये

**१०. अर्थव्यवस्थेची महत्त्वाची वैशिष्ट्ये काय आहेत?**

**उत्तर:** अर्थव्यवस्थेची महत्त्वाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे:

i. विशिष्ट भौगोलिक क्षेत्र

ii. नैसर्गिक साधनसामग्री

iii. लोकसंख्या

iv. राजकीय सार्वभौमत्व

v. क्षेत्रिय विभाजन

**११. अर्थव्यवस्थेवरून देशाची सीमा कशी ठरवली जाते?**

**उत्तर:** i. प्रत्येक अर्थव्यवस्थेचे सुनिश्चित असे विशिष्ट भौगोलिक क्षेत्र असते व ते देशांच्या सीमा ठरवते.

ii. उदा. भारत: २८ घटक राज्ये व ७ केंद्रशासित प्रदेश.

[ टीप: सध्या भारतात २९ राज्ये आहेत. ]

**१२. भारतीय अर्थव्यवस्थेने किती भूक्षेत्र व्यापले आहे?**

**उत्तर:** भारतीय अर्थव्यवस्थेचे सुमारे ३२,८७,२६३ चौकिमी भूक्षेत्र असून पृथ्वीवरील एकूण भूक्षेत्रापैकी २.४ टक्के भूक्षेत्र व्यापले आहे.

**१३. नैसर्गिक साधनसामग्री म्हणजे काय?**

**किंवा**

**नैसर्गिक साधनसामग्री म्हणजे काय? उदाहरण द्या.**

**[जुलै १६]**

**उत्तर:** i. निसर्गाकडून विनामूल्य उपलब्ध झालेली साधनसामग्री म्हणजे नैसर्गिक साधनसामग्री होय.

ii. उदा. हवा, पाणी, सूर्यप्रकाश, जंगले, समुद्र, डोंगर, खनिजे इ.

***१४. नैसर्गिक साधनसंपत्तीची दोन उदाहरणे द्या.**

**[मार्च १५]**

**उत्तर:** भूमी, डोंगर, पाणी, सूर्यप्रकाश, समुद्र, जंगले, खनिजसाठे इ. नैसर्गिक साधनसंपत्तीची उदाहरणे आहेत.

[कोणतीही दोन उदाहरणे लिहा.]

**१५. अर्थव्यवस्थेतील उत्पादनपातळीवर कशाचा परिणाम होतो?**

**उत्तर:** साधनसामग्रीची उपलब्धता आणि वापर यांचा अर्थव्यवस्थेतील उत्पादन पातळीवर परिणाम होतो.

**१६. देशातील श्रमपुरवठा कशावर आधारित असतो?**

**उत्तर:** i. देशातील श्रमपुरवठा लोकसंख्येच्या आकारमानावर अवलंबून असतो.

ii. शिक्षण, प्रशिक्षण आणि आरोग्य सेवा हे घटक मानवी संसाधनाची म्हणजेच उत्पादन कार्यात वापरल्या जाणाऱ्या लोकसंख्येची गुणवत्ता सुधारतात.

**१७. कोणते घटक मानवी संसाधनाची गुणवत्ता सुधारतात?**

**उत्तर:** i. शिक्षण, प्रशिक्षण आणि आरोग्य सेवा हे घटक मानवी संसाधनाची गुणवत्ता सुधारतात.

ii. यांचा वापर उत्पादन कार्यात केला जातो.

**१८. अर्थव्यवस्थेच्या तीन क्षेत्रांची नांवे सांगा.**

**उत्तर:** अर्थव्यवस्थेची तीन क्षेत्रे:

i. प्राथमिक क्षेत्र, उदा. शेती, पशुपालन इ.

ii. द्‌वितीय क्षेत्र, उदा. कारखानदारी, बांधकाम इ.

iii. तृतीय क्षेत्र, उदा. वाहतूक, शिक्षण इ.

**१९. प्राथमिक क्षेत्रातील उपक्रमांची नावे सांगा.**

**उत्तर:** प्राथमिक क्षेत्रातील उपक्रम:

i. शेती
ii. पशुपालन
iii. कुक्कुटपालन
iv. मत्स्यव्यवसाय
v. जंगल व्यवसाय
vi. खाणकाम

**२०. कोणते क्षेत्र औद्योगिक क्षेत्र म्हणून ओळखले जाते?**

**उत्तर:** i. द्वितीय क्षेत्र औद्योगिक क्षेत्र म्हणून ओळखले जाते.

ii. या क्षेत्रात यंत्राच्या साहाय्याने कच्च्या मालाचे रूपांतर पक्क्या मालात केले जाते.

**२१. द्वितीय क्षेत्रातील व्यवसायांची नावे सांगा.**

**उत्तर:** द्वितीय क्षेत्रातील व्यवसायांची नावे:

i. कारखानदारी
ii. बांधकाम
iii. वीजनिर्मिती
iv. नैसर्गिक वायू
v. पाणीपुरवठा

**२२. तृतीय क्षेत्रातील सेवांची नावे सांगा.**

**उत्तर:** तृतीय क्षेत्रातील सेवा:

i. वाहतूक
ii. दळणवळण
iii. बँका
iv. विमा व्यवसाय
v. व्यापार
vi. वित्त (फायनान्स)
vii. आरोग्य
viii. शिक्षण
ix. उपहारगृह
x. मनोरंजन

**२३. भारताच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचे क्षेत्रीय विभाजन २०११ मध्ये कसे होते?**

**उत्तर:** i. 'स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचे क्षेत्रीय विभाजन' हा देशाच्या आर्थिक विकासाचे मापन करण्याचा एक निर्देशांक आहे.

ii. २०११ या वर्षाचे स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचे क्षेत्रीय विभाजन पुढीलप्रमाणे होते:

अ. प्राथमिक क्षेत्र ५६ % होते.

ब. द्वितीय क्षेत्र २६ % होते.

क. तृतीय क्षेत्र १८ % होते.

## प्र.३. पुढील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यांत उत्तरे द्या.

### १.३ अर्थव्यवस्थेचे प्रकार

---

***१. अर्थव्यवस्थेचे विविध प्रकार स्पष्ट करा.**

**उत्तर:** अर्थव्यवस्थेचे विविध प्रकार पुढीलप्रमाणे:

i. **भांडवलशाही अर्थव्यवस्था:**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उत्पादनाच्या साधनांची मालकी आणि व्यवस्थापन खाजगी व्यक्तींकडे

असते. कमाल नफा मिळवणे हा भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील उत्पादकांचा मुख्य हेतू असतो. उदा. अमेरिकन संघराज्ये.

ii. **समाजवादी अर्थव्यवस्था:**

समाजवादी अर्थव्यवस्थेत उत्पादनाचे घटक एकत्रितरीत्या संपूर्ण समाजाच्या मालकीचे असतात; म्हणून उत्पादनाच्या साधनांचे स्वामित्व आणि व्यवस्थापन सरकारकडून केले जाते. सामाजिक कल्याण साधणे हा या अर्थव्यवस्थेचा मुख्य हेतू असतो. उदा. चीन

iii. **मिश्र अर्थव्यवस्था:**

मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक आणि खाजगी या दोन्ही क्षेत्रांचे सह-अस्तित्व असते. याबाबतीत उत्पादनाच्या साधनांचे स्वामित्व आणि व्यवस्थापन सरकारकडे तसेच खाजगी क्षेत्राकडेदेखील असते. उदा. भारत.

**२. देशाच्या लोकसंख्येच्या आकारमानाशी संबंधित तीन संकल्पना स्पष्ट करा.**

**उत्तर:** देशातील श्रमपुरवठा लोकसंख्येच्या आकारमानावर अवलंबून असतो. देशाच्या लोकसंख्येच्या आकारमानाशी संबंधित तीन संकल्पना पुढीलप्रमाणे:

i. **पर्याप्त लोकसंख्या:**
हा देशातील लोकसंख्येचे आदर्श आकारमान दर्शविते. याबाबतीत उपलब्ध साधनसामग्रीचा परिपूर्ण वापर केला जातो.

ii. **अतिरिक्त लोकसंख्या:**
पर्याप्त लोकसंख्येपेक्षा अधिक लोकसंख्या म्हणजे अतिरिक्त लोकसंख्या होय. त्यामुळे उपलब्ध साधनसामग्रीवर ताण वाढतो.

iii. **न्यून (कमी) लोकसंख्या:**
न्यून लोकसंख्या ही अशी स्थिती असते, की ज्यात उपलब्ध साधनसामग्रीचा पूर्ण वापर करण्यासाठी लोकसंख्या पुरेशी नसते.

**३. राजकीय सार्वभौमत्व म्हणजे काय?**

**उत्तर:** i. 'सार्वभौमत्व' म्हणजे सर्वोच्च सत्ता किंवा अधिकार होय.

ii. राजकीय सार्वभौमत्वाचा अर्थव्यवस्थेशी प्रत्यक्ष संबंध असतो.

iii. नियम तयार करणे व कायद्याची अंमलबजावणी करणे यासाठी सरकारला सर्वोच्च अधिकार असणे आवश्यक आहे.

iv. स्वतंत्र व राजकीयदृष्ट्या सार्वभौम राष्ट्र देशाच्या सामाजिक व आर्थिक कल्याणासंबंधी निर्णय घेऊ शकते.

***४. 'क्षेत्रीय विभाजन' हे अर्थव्यवस्थेचे एक वैशिष्ट्य, स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. मालकी आणि व्यवस्थापनाच्या आधारे क्षेत्रांचे खाजगी क्षेत्र, सरकारी क्षेत्र, संयुक्त क्षेत्र असे वर्गीकरण केले जाते.

ii. तसेच, उपक्रमांच्या स्वरूपानुसार विविध उत्पादक उपक्रमांचे मुख्यत: अर्थव्यवस्थेच्या तीन क्षेत्रांत वर्गीकरण केले जाते,

**अ. प्राथमिक क्षेत्र:**

प्राथमिक क्षेत्राला कृषी क्षेत्र असेही म्हणतात. मुख्यत: नैसर्गिक साधनसामग्रीवर आधारित व्यवसायांचा यात समावेश होतो. उदा. शेती आणि पशुपालन, कुक्कुटपालन, मत्स्यव्यवसाय, जंगल व्यवसाय, खाणकाम इत्यादी. भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेत निम्म्याहून अधिक लोकसंख्या प्राथमिक क्षेत्राशी संलग्न असते.

**ब. द्‌वितीय क्षेत्र:**

द्‌वितीय क्षेत्राला औद्योगिक क्षेत्र असेही म्हणतात. यात कारखानदारी, बांधकाम, वीज, नैसर्गिक वायू, पाणीपुरवठा इत्यादींशी संबंधित व्यवसायांचा समावेश होतो.

**क. तृतीय क्षेत्र:**

तृतीय क्षेत्राला सेवा क्षेत्र असेही म्हणतात. यात वाहतूक, बँका, दळणवळण, विमा व्यवसाय, व्यापार, वित्त, आरोग्य, शिक्षण, उपहारगृह, मनोरंजन यांसारख्या सेवांचा समावेश होतो.